# कार्यालय दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी

**क्रमांक/ वित्त/ ६३ /२०२४, दिनांक :- १६ जानेवारी, २०२४.**

## -: दर पत्रक/निवीदा सूचना :-

याव्दारे कळविण्यात येते की, दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी येथील ग्रंथालयातील कायदयाचे पुस्तके ठेवण्याकरीता खालील वर्णन केल्याप्रमाणे बुकसेल्फ खरेदी करावयाची असल्याने त्याबाबत ईच्छुक प्रतिष्ठानाची तुलनात्मक दराची सिलबंद निवीदा दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी यांचे नांवानी **दिनांक २३ जानेवारी,२०२४ च्या सांयकाळी ५.३०** वाजपर्यन्त दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी येथे सादर करण्यात यावे तसेच लिफाफयावर **'बुक सेल्फ (Book Case) सेल्फ करीता निवीदा '** असे नमूद करावे.

### बुक सेल्फ चे विनीर्दिष्ट खालीलप्रमाणे ( Specification )

| अ.कं. | खरेदी साहित्याचे विवरण | खरेदीची संख्या |
|---|---|---|
| १ | बुक सेल्फ ग्रंथालयाकरीता<br>Book Case (4 Door) Size 66*33*12 inch 22 gage. | ०३ |

**अटी व शर्ती :-**

१. वरील वर्णनामध्ये नमूद केलेले बुक सेल्फचा स्पेशीकेशनप्रमाणे पुरवठा करणे अनिवार्य राहील. त्यांचे दर सर्व प्रकारच्या करासहीत असले पाहिजेत. आणि निवीदेमध्ये (Including or Excluding) याप्रमाणे निवीदेमध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

२. सदरहू साहित्य दिवाणी व फौजदारी न्यायालय,अहेरी येथे पोहचता करणे अनिवार्य आहे. पोहोचता करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

३. सदरहू बुककेस/बुकसेल्फचा दर्जा हा उत्तम प्रकारचा असावा.

४. साहित्याचा स्पेशीफिकेशप्रमाणे वे सुस्थितीत पुरवठा झाल्याबाबत कार्यालयाची खात्री पटल्यानंतरच साहित्याच्या रक्कमेचे कार्यालयाकडून प्रदानाची कार्यवाही करण्यात येईल.

५. वरील बुककेस/बुकसेल्फ साहित्य पुरविण्याचा आदेश दिल्यास, सदरहू साहित्य मुदतीमध्ये पुरवठा करणे अनिवार्य आहे. अन्यथा विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास पुरवठा करण्याकरीता दिलेला आदेश रद्द समजण्यात येईल, यांची पुरवठादारानी नोंद घ्यावी.

६. साहित्याचा पुरवठा करताक्षणी व्दीप्रतीत बिल कार्यालयात सादर करावे.

७. निवीदा कोणत्याही कारणास्तव रद्द करणे किंवा मागणी संख्येत वाढ किंवा घट करणे याबाबतचा पुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिकारी यांना राहील.

८. दरपत्रकामध्ये जीएसटी कमांक नमूद करणे तसेच सोबत पॅन कार्ड तसेच स्थानिक प्रशासनाने व्यवसाय करण्याकरीता पुरविलेल्या प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत जोडणे अनिवार्य आहे.

16/1/24

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी

..२..

**<u>प्रत :-</u>**

१. मा. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदरहू टेंडर नोटीसची प्रत जिल्हा न्यायालयाचे संकेत स्थळावर प्रकाशित करण्याकरीता सादर.

२. टेंडर नोटीसची प्रत बेलिफामार्फत दिवाणी व फौजदारी न्यायालय, अहेरी यांचे नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यात यावे.

16/1/24

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी